कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे

# आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आष्टा

## मराठी विभाग

## वार्षिक अहवाल

## २०२५-२६

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मराठी विभागाने ३/०७/२०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता कार्यभार वाटपाची बैठक आयोजित केली मराठी विभाग प्रमुख म्हणून डॉ. डी. जे. दमामे हे कार्यरत आहेत. सदर शैक्षणिक वर्षामध्ये मराठी विभागातील अध्यापन व इतर शैक्षणिक जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने पार पाडण्यासाठी विभागातील कार्यभाराचे नियोजन करण्यात आले प्रत्येक वर्गाच्या अभ्यासक्रमानुसार विषयांचे विभाजन करून अध्यापकांना अध्यापन कार्य सोपविण्यात आले.

तसेच विभागीय उपक्रम, सेमिनार, प्रकल्प मार्गदर्शन, अंतर्गत मूल्यमापन, परीक्षा कार्य इत्यादी जबाबदाऱ्या देखील नियोजनबद्ध पद्धतीने विभागण्यात आल्या आहेत. यामुळे अध्यापनाची गुणवत्ता राखण्यास आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

**कार्यभार वितरण २०२५-२६**

| प्राध्यापकांची नावे | वर्ग | विषय | कार्यभार | एकूण कार्यभार |
|---|---|---|---|---|
| डॉ.डी जे दमामे | बीए भाग ३ | साहित्यविचार<br>मराठी भाषा व भाषा<br>विज्ञान पेपर क्र ८,१३<br>मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतिहास पेपर क्र ९,१४<br>मराठी भाषा आणि अर्थार्जनाचा संधी पेपर क्र १०,१५<br>वाघ वाड्मयी प्रवाहाचे अध्ययन अनुभव कथन पेपर क्रमांक ११,१६<br>SEC | ०४<br>०४<br>०४<br>०४<br>०४ | २० |
| प्रा. बि.ई आवटे | बीए भाग१<br>बीए भाग २ | रुजुवात<br>Majar<br>Minor<br>VSC<br>SEC<br>IKS | ०२<br>०२<br>०२<br>०२<br>०२<br>०१ | ११ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रा.आर. डी.निकम | बीए भाग१<br>बीए भाग २ | रुजुवात<br>Majar<br>Minor<br>VSC<br>SEC<br>IKS | ०२<br>०२<br>०२<br>०२<br>०२<br>०१ | ११ |
| | | एकूण कार्यभार | | ४२ |

``

## सत्र १ आणि सत्र २ मिटिंग

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मराठी विभागाने ७/०७/२०२५ रोजी सकाळी९.००वाजता मराठी विभागामध्ये सत्र १ची बैठक आयोजित केली.

अध्यक्ष: डॉ. डी.जे.दमामे (विभागप्रमुख)

उपस्थित सदस्य:

१. प्रा. भीमसेन आवटे

२. प्रा. रुपाली निकम

मीटिंगचा उद्देश:

मराठी विभागाच्या सत्र १ व सत्र २ मधील शैक्षणिक कामकाजाचा आढावा घेणे,येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन करणे व विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत चर्चा करणे.

महत्वाचे निर्णय:

सत्र १:

- अभ्यासक्रम पूर्णत्वाची स्थिती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.
- विद्यार्थ्यांच्या उपस्थिती व शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला.
- अंतर्गत मूल्यमापन पद्धती अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या.
- विद्यार्थ्यांच्या वाचन व लेखन कौशल्य वाढीसाठी निबंध स्पर्धा व वाचन उपक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला

सत्र २:

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मराठी विभागाने ०४/११/२०२५ रोजी सकाळी९.००वाजता मराठी विभागामध्ये सत्र १ची बैठक आयोजित केली

सत्र २ च्या अभ्यासक्रमाचे नियोजन व वेळापत्रक निश्चित करण्यात आले.

- प्रकल्प कार्य व सादरीकरणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे ठरविण्यात आले.
- परीक्षेची तयारी व प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपावर चर्चा करण्यात आली.

- विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी अतिरिक्त वर्ग घेण्याचे निश्चित करण्यात आले.

महत्वाचे निर्णय:

- सर्व प्राध्यापकांनी नियोजित वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करावा.
- विद्यार्थ्यांसाठी पूरक शैक्षणिक उपक्रम नियमितपणे आयोजित करावेत.
- नियमित चाचण्या घेऊन विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करावे.

# भित्तिपत्रिका अनावरण

## अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२५-२६

## ३/१०/२०२५ ते १४/१०/२०२५

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मराठी विभागाने ३/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने भित्तिपत्रिका अनावरण आयोजित केले या भित्तिपत्रिकांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग कामगिरी केलेल्या स्त्रियांच्या कार्याचा आढावा विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात आला .याचा उद्देश त्यांना प्रोत्साहन देणे आणि सर्जनशीलता व अभिव्यक्तीला चालना देणे हा होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते झाले त्यामध्ये आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.अरुण पाटील  सर, इंग्रजी विभाग प्रमुख एस.जी.पाटील सर ,सीनियर क्लार्क भोईसर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी महाविद्यालयातील  ज्युनियर विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.दमामे सर यांनी केली. भित्तिपत्रिका अनावरणाचे उद्दिष्ट आणि महत्त्व स्पष्ट केले. हा कार्यक्रम यशस्वी ठरला ज्यामुळे साहित्यिक अभिरुचीला प्रोत्साहन मिळाले सर्व विद्यार्थ्यांनी उत्साह अभिव्यक्ती आणि आत्मविश्वासाने भित्तिपत्रिकाचे वाचन केले या सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कृतीशीलता व सर्जनशीलता नक्कीच सुधारली.

# भित्तिपत्रिका अनावरण आणि पुस्तक प्रदर्शन

## मराठी भाषा दिन २०२५-२६

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मराठी विभागाने  २७/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता मराठी भाषा दिन निमित्ताने भित्तिपत्रिका अनावरण आणि पुस्तक प्रदर्शन आयोजित केले या निमित्ताने प्रख्यात साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या साहित्यकृतींचे विशेष पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. तसेच विविध संतांच्या साहित्याचे आणि त्यांच्या कार्याचा परिचय करून देणारे प्रदर्शनही मांडण्यात आले होते. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांविषयी अधिक माहिती मिळाली व त्यांच्या ज्ञानात भर पडली

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण पाटील सर यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व  सिनियर, ज्युनियर ,विभागातील सर्व प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा.आवटे सर यांनी केली. भित्तिपत्रिका अनावरणाचे उद्दिष्ट आणि मराठी भाषा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले हा कार्यक्रम यशस्वी ठरला ज्यामुळे साहित्यिक अभिरुचीला प्रोत्साहन मिळाले सर्व विद्यार्थ्यांनी उत्साह अभिव्यक्ती आणि आत्मविश्वासाने भित्तिपत्रिकाचे वाचन केले या सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये कृतीशीलता व सर्जनशीलता नक्कीच सुधारली.

मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ.दमामे सर यांनी मान्यवर व सहभागी सर्व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मराठी विभागामार्फत करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीरीत्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान आणि जाणीव निर्माण करण्यास हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला.

## गुणवंत विद्यार्थी सत्कार

महाविद्यालयातील मराठी विभागासाठी अभिमानाची बाब म्हणजे विद्यार्थिनी अनुराधा हिने विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या परीक्षेत शिवाजी विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. तिला विद्यापीठाकडून खालील पुरस्कार/पारितोषिके प्रदान करण्यात आली आहेत:

१)लेट प्रिन्सिपल एस. के. ऊर्फ बापूसाहेब उणुणे पुरस्कार

२)कै. डॉ. विष्णू बाळकृष्ण ऊर्फ मधू कुलकर्णी स्मृती पारितोषिक

३)गुरुवर्य वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर पारितोषिक

४)पूज्य स्वामी स्वरूपानंद पुरस्कार


५)कै. लक्ष्मीबाई भरतार व्यंकटेश कुलकर्णी स्मृती पुरस्कार

६)शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे पारितोषिक

अनुराधा ही अत्यंत मेहनती, जिद्दी व अभ्यासू विद्यार्थिनी आहे. तिने वर्षभर सातत्याने अभ्यास करून उत्कृष्ट यश संपादन केले. तिच्या या यशामुळे केवळ मराठी विभागाचाच नव्हे तर संपूर्ण महाविद्यालयाचाही गौरव वाढला आहे.

तिच्या यशामागे तिचे स्वतःचे कष्ट , तसेच प्राध्यापकांचे मार्गदर्शन व पालकांचा पाठिंबा महत्त्वाचा आहे. मराठी विषयातील तिची आवड आणि अभ्यासाची सखोलता यामुळेच तिने हा मानाचा पहिला क्रमांक मिळविला

आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने अनुराधाचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.







सिनियर विभाग प्रवेश
LIBRARY NOTICE BORD
पी. जी. प्रवेश
ज्युनिअर विभाग प्रवेश
शिवाजी विद्यापीठ परीक्षा
NO


परिमल
सर्व शिष्यवृत्ती
GPS Map Camera
Ashta, Maharashtra, India
Wcv6+2hp, Gandhinagar, Ashta, Maharashtra 416301, India
Lat 16.942547° Long 74.411518°
Friday, 27/02/2026 09:54 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Google
Ashta, Maharashtra, India
Wcv6+2hp, Gandhinagar, Ashta, Maharashtra
416301, India
Lat 16.94259° Long 74.411535°
Friday, 27/02/2026 09:52 AM GMT +05:30


SCIENCE FACULTY
COMMERCE & MANAGEMENT
HUMANITIES
SOCIAL NETWORKING
E-RESOURCES
ANUBHUTI HINDI
BHARAT DARSHAN HINDI
GPS Map Camera
Google
Ashta, Maharashtra, India
Wcv6+2hp, Gandhinagar, Ashta, Maharashtra
416301, India
Lat 16.942535° Long 74.411448°
Friday, 27/02/2026 09:55 AM GMT +05:30

# आष्टा कॉलेजमध्ये 'अभिजात मराठी भाषा दिवस' साजरा

**बंधुता न्यूज नेटवर्क**

आष्टा : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्यापासून मायबोली मराठी समाज मनामध्ये रूजविण्याचे यशस्वी प्रयत्न झाले. हे समजून घेऊन समाजाने मराठी भाषा टिकवून ठेवणे आवश्यक आहे.असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.अरूण पाटील यांनी केले.

आष्टा येथिल आर्टस्,कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज मधील मराठी विभागामार्फत अभिजात मराठी भाषा दिवस साजरा करण्यात आला .या प्रसंगी बोलत होते. यावेळी डॉ.सुनिल पाटील, डॉ. एस. आर. पवार डॉ. पी. ए. ओलेकर, प्रा. रूपाली निकम, प्रा.डॉ.मोहिते प्रशासकीय सेवक अमोल पाटील, अरूण भोई, उपस्थित होते.



यानिमित्ताने कर्तृत्ववान महिलांचे गौरव लेख भितीपत्रकाच्या ध्यमातूनप्रकाशित करण्यात आले.प्रास्ताविक प्रा.डॉ.डी.जे.दमामे यांनी केले आभार प्रा. भीमसेन आवटे यांनी मानले.


राजारामबापू पाटील सभागृह, आष्टा


NO SMOKING
परिमल

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000, www.unishivaji.ac.in, ba.section@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी – ईपीएबीएक्स – २६०९०००, www.unishivaji.ac.in,
ba.section@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Ref. No. SU/B.A.Exam/Paritoshik/ 1175 Date- / /2025

16 DEC 2025

**! Congratulation !**

To,

**Smt. Gurav Anuradha Rajendra**
A P/.Nagaon Tal-Walwa,
Dist-Sangli
Mob. No-9923087435

**Madam,**

I am to inform you that the following prizes have been awarded to you, at the B.A. Degree examination held in March/ April 2025.

**"LATE PRIN. S. K. alias BAPUSAHEB UNUNE PRIZE"**
**"LATE DR. VISHNU BALKRISHNA alias MADHU KULKARNI SMRUTI PARITOSHIK"**
**"GURUVARYA V. S. alias BHAUSAHEB KHANDEKAR PARITOSHIK"**
**"PUJYA SWAMI SWAROOPANAND PRIZE"**
**"LATE LAXMIBAI BHARTAR VYANKATESH KULKARNI MEMORIAL PRIZE"**
**"SHIKSHAN MAHARSHI DR. BAPUJI SALUNKHE PARITOSHIK"**

Above prizes have been awarded to you as you stood first in the successful **eligible Candidates Highest Marks in Marathi as special Subject at the B.A. Degree examination held in March/ April 2025.**

You are requested to complete the enclosed bill form and send it to this office for further needful. The amount of prizes will be sent to you separately by cheque and certificates of prizes will be handed over to you in convocation section at Shivaji University, Kolhapur on the day of convocation.

Yours faithfully,

Asst. Registrar

*Encl : As above Copy to :*
1. ***The Principal, Arts & Commerce College, Ashta***
2. *Account Section*
3. *Convocation Section for information and necessary action.*

---

# अनुराधा गुरव मराठी विषयात विद्यापीठात प्रथम

**दै. क्रांती \ बागणी**



नागाव येथील विद्यार्थिनी अनुराधा राजेंद्र गुरव ही सध्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आष्टा येथील विद्यालयात बी ए भाग तीन मध्ये मराठी विषयातून शिकत होती. तिचा विद्यापीठात प्रथम क्रमांक आला असून तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. तिला गोल्ड मेडल व पदवी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तिला लेट प्रिन्सिपल एस. के. ऊर्फ बापूसाहेब उणुणे पुरस्कार, कै. डॉ. विष्णू बाळकृष्ण ऊर्फ मधू कुलकर्णी स्मृती पारितोषिक, गुरुवर्य वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर पारितोषिक, पूज्य स्वामी स्वरूपानंद पुरस्कार, कै. लक्ष्मीबाई भरतार व्यंकटेश कुलकर्णी स्मृती पुरस्कार, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे पारितोषिक अशी अन्य पारितोषिके प्राप्त झाली. त्याला आई वडील, प्राचार्य डॉ. अरुण पाटील, डॉ. डी. जे. दमामे, प्रा. बी. इ. आवटी, प्रा. आर. डी. निकम यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी समाजातील अनेक मान्यवरांनी तिला भेटून व फोनवरून शुभेच्छा दिल्या.


सन 2024/25 या शैक्षणिक वर्षात बी.ए.पदवी परीक्षा
मराठी विषयामध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून
प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण (Gold Medalist)
कु.अनुराधा राजेंद्र गुरव
हार्दिक
अभिनंदन
इतर पुरस्कार/पारितोषिके
1)लेट प्रिन्सिपल एस. के. ऊर्फ बापूसाहेब उणुणे पुरस्कार
2)कै. डॉ. विष्णू बाळकृष्ण ऊर्फ मधू कुलकर्णी स्मृती पारितोषिक
3)गुरुवर्य वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर पारितोषिक
4)पूज्य स्वामी स्वरूपानंद पुरस्कार
5)कै. लक्ष्मीबाई भरतार व्यंकटेश कुलकर्णी स्मृती पुरस्कार
6)शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे पारितोषिक
शुभेच्छुक
समस्त गुरव परिवार व ग्रामस्थ,नागांव.


आरपार झुंजार
एकनाथ पाटील

# अनुराधा गुरव मराठी विषयात विद्यापीठात प्रथम



**बागणी :** नागाव येथील विद्यार्थिनी अनुराधा राजेंद्र गुरव ही सध्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आष्टा येथील विद्यालयात बीए भाग तीनमध्ये मराठी विषयातून शिकत होती. तिचा विद्यापीठात प्रथम क्रमांक आला असून तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. तिला गोल्ड मेडल व पदवी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तिला लेट प्रिन्सिपल एस. के. ऊर्फ बापूसाहेब उणुणे पुरस्कार, कै. डॉ. विष्णू बाळकृष्ण ऊर्फ मधू कुलकर्णी स्मृती पारितोषिक, गुरुवर्य वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर पारितोषिक, पूज्य स्वामी स्वरूपानंद पुरस्कार, कै. लक्ष्मीबाई भरतार, व्यंकटेश कुलकर्णी स्मृती पुरस्कार, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे पारितोषिक अशी अन्य पारितोषिके प्राप्त झाली. तिला आई–वडील, प्राचार्य डॉ. अरुण पाटील, डॉ. डी. जे. दमामे, प्रा. बी. इ. आवटी, प्रा. आर. डी. निकम यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अनेकांनी तिला भेटून व फोनवरून शुभेच्छा दिल्या.









प्राचार्य विभागप्रमुख